# हरवलेली पैशांची बॅग पोलीस आणि पत्रकारांच्या तत्परतेने मिळाली



**नांदेड** – इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सराफा भागात खरेदीसाठी गेलेल्या एका महिलेची पर्स विसरली. विसरलेली पर्स याच भागात राहणाऱ्या सर्जू हातवळणे या युवकास सापडली. त्याने ती बॅग इतवारा पोलिसांच्या स्वाधीन केली. त्यानंतर इरफान बेगम शेख जफर यांना ती बॅग परत करण्यात आली. यावेळी सर्जू हातवळणे यांच्या प्रामाणिकतेबद्दल पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांनी त्याचे कौतुक केले.

इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सराफा बाजार भागात शहराच्या मेहबूबनगर देगलूर नाका परिसरातील इरफान बेगम शेख जफर ह्या खरेदीसाठी आल्या होत्या. परंतु सराफा बाजार भागात त्यांची बॅग विसरली. विसरलेली बॅग सर्जू हातवळणे आणि त्यांची पत्नी यांना मिळाली. त्यांनी ही बॅग तिथेच उपस्थित असलेल्या काही नागरिकांच्या लक्षात आणून दिली. त्यावेळी पत्रकार नईमखान यांना ही माहिती समजली. यावेळी नईमखान यांनी सर्जू हातवळणे यांच्याशी संपर्क साधून इतवारा पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांना ही माहिती दिली. तोपर्यंत आपली दोन तोळे सोने, साडेसात हजार रुपये रोख आणि मोबाईल असलेली पर्स हरवल्याची माहिती देण्यासाठी इरफान बेगम ह्या इतवारा ठाण्यात पोहोचल्या. त्यानंतर राजू सर्जू हातवळणे ही बॅग घेऊन पोलीस ठाण्यात आले. बॅगमधील दागिने पाहून व सर्व मुद्देमाल पाहून इरफान बेगम यांना आनंद झाला. पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांनी सरजू हातवळणे यांच्या प्रामाणिकतेबद्दल त्याचा पोलीस ठाण्यात सत्कार केला

दै. दलितवाणी

# भोकर पोलिसांची धाडसी कारवाई

## ३३५०० रुपयांचा गुटखा पकडून केला गुन्हा दाखल गुटका किंग शेख रजाक शेख हबीब व शेख अहेमद शेख हबीब फरार

भोकर (अनिल डोईफोडे) गुटखा विक्री बंदी असताना बाजारात विक्रीसाठी नेत असलेला गुटखा भोकर पोलीस आणि पकडून आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे या करावयाने गुटखा माफियात खळबळ उडाली असून शरीरातील गुटखाकींग कोण याचा शोध पोलीस करीत आहेत शासनाने प्रतिबंधित केलेला तंबाखू जन्य पदार्थ हा मानवी आरोग्यास हानिकारक असून ते सेवन केल्यास व्यक्तीला दुर्धर आजार होऊन वेळ प्रसंगी जीवही गमवावा लागतो तरी देखील शहरासह तालुक्यात जाणीवपूर्वक खुलेआम घोटका विकण्याचा संघ काही गुटका माफी यांनी उराशी बाळगला आहे

गुरुवारी शहरासह ग्रामीण भागात दुचाकीवरून गुटखा विक्रीसाठी जात असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली यावर दुपारी चार वाजता मुदखेड चौक परिसरात पोलीस उपनिरीक्षक दिगंबर पाटील पोलीस कॉन्स्टेबल जाधव पोलीस कॉन्स्टेबल पोलीस कॉन्स्टेबल अर्कीलवार पवार यांच्या पथकाने अचानक छापा टाकून सुमारे ५८ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्याची धाडसी कारवाई केली आहे.

या कारवाईत आरोपी शेख आरबाज शेख लतीफ वय वीस वर्षे राहणार फुलेनगर यांच्याकडे २५ हजार रुपयांची जुनी लुना व सुमारे ३३ हजार पाचशे रुपयांचा गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ आढळून आले आरोपी शेख अरबाजला पोलीस खाक्या दाखवताच गुन्हा कबूल करून मी नोकर आहे खरे मालक हे शेख रजाक शेख हबीब व शेख अहेमद शेख हबीब हे असल्याचे सांगितले यावरून पोलिसांनी कलम ३२८, २७२, २७३ ,१८८ सह कलम २६, २७, २३, ३०(२ )५९ (ळीं) अन्नसुरक्षा मानके कायदा २००६ नियम व नियमन २०११ अन्वये कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दिगंबर पाटील हे करत आहेत.